Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 554 – 558

DOI: 10.5281/zenodo.10137654

**Original Research Article**

# महात्मा गांधी: सत्य आणि अहिंसा एक चिरंतन विचार

प्रा. डॉ. कविता चंद्रकांत लोहाळे

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, ग्रामीण (कला वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय वसंतनगर, मुखेड ता. मुखेड जि. नांदेड ४३१७१५ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: kavitalohale76@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

माणूस इतिहास घडवतो आणि माणसाला घडवतात ते त्याचे विचार! येणाऱ्या पिढीला घडवण्यासाठी, त्यांच्या उज्वल भविष्यासाठी सत्य, अहिंसा या मूल्यांची नितांत आवश्यकता आहे. सद्यस्थितीत समाजात झालेला बदल टिपताना असे लक्षात येते की, मानवी मूल्यांचा सातत्याने ऱ्हास होत आहे. त्यामुळे विध्वंसक बनलेले समाजमन समाजात एक प्रकारची अस्वस्थता निर्माण करत आहे. या संदर्भाने मार्टिन ल्युथर किंग यांचे विचार हिंसेचे विश्लेषण अगदी ठळकपणाने करतात." हिंसा अनैतिक आहे; कारण प्रेमापेक्षा द्वेषावर तिचा भर असतो. हिंसेमुळे समाजाचा नाश होतो आणि भ्रातृभाव अशक्यप्राय होतो. हिंसेमुळे समाजात सहकार्य ऐवजी विभक्तपणाची प्रवृत्ती निर्माण होते. हिंसेमुळे पराभूत लोकात कडवटपणा आणि विजेत्यांत पाशवी वृत्ती निर्माण होते. हिंसेचा शेवट अखेर खुद्द हिंसेच्याच पराभवात होतो". आधुनिक काळातील माणसाने केलेल्या शास्त्रीय व तांत्रिक प्रगतीचे नेत्रदीपक चित्र डोळ्यासमोर उभे असताना या पार्श्वभूमीवर मार्टिन ल्युथर किंग यांच्या विचारांची प्रस्तुतता लक्षात येते. अहिंसा ही माणसातील आध्यात्मिक व नैतिक मागासलेपणा घालवू पाहते. अहिंसा ही नैतिक साधनांद्वारे नैतिक उद्दिष्ट साध्य करू पाहते. अहिंसा हे प्रभावी व न्याय शस्त्र आहे. जखम न करता अहिंसा शस्त्रक्रिया करते आणि हे शस्त्र पेलणारा माणूस स्वतः उदात्त बनतो. इसवी सन १९२० सालापासून १९४८ पर्यंत भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व महात्मा गांधींच्या हाती होते. सत्य व अहिंसा ही गांधी मार्गातील श्रेष्ठ साधने होती. ही साधने जनसामान्यांवर बिंबविण्याचा महात्मा गांधी यांचा सतत प्रयत्न होता. सत्य दर्शनासाठी सर्व आयुष्यभर त्यांनी प्रयोग केले. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील त्यांनी केलेले नेतृत्व त्या प्रयोगापैकीच एक होते. आजची जागतिक स्थिती, त्यातील चंगळवाद, वाढता दहशतवाद, भौतिक सुखाच्या मागे धावणारी नवीन पिढी, शिक्षणाला

विक्री योग्य वस्तू समजणारी वर्तमान स्थिती, त्याचबरोबर नैतिकतेस फारसे स्थान न देणारी मानसिकता हे लक्षात घेतल्यास सद्यस्थितीत महात्मा गांधी यांच्या विचारांची असलेली गरज लक्षात येते.

गांधीजींच्या अहिंसेचे स्वरूप पाहता आपल्याला हे लक्षात येते की गांधीजींची अहिंसा निषेधात्मक, विधायक आणि निरपेक्ष स्वरूपाची होती. निषेधात्मक अहिंसा म्हणजेच व्यक्तीने आपल्या कृतीद्वारे, शब्दाद्वारे किंवा विचाराद्वारे इतरांना कष्ट देऊ नये. यालाच गांधीजी निषेधात्मक अहिंसा म्हणतात. स्वार्थ, तिरस्कार व दुष्टपणामुळे कोणालाही दुःख न देणे तसेच कोणाचीही हत्या न करणे म्हणजे निषेधात्मक अहिंसा होय. विधायक अहिंसा याबाबत गांधीजींचे विचार पुढीलप्रमाणे “केवळ दुसऱ्याला त्रास न देणे किंवा हत्या न करणे याला खऱ्या अर्थाने अहिंसा म्हणता येणार नाही तर दुसऱ्यावर प्रेम करून त्याच्या सुखासाठी झटणे हीच खरी अहिंसा होय”. निरपेक्ष अहिंसा या संदर्भाने गांधीजींचे विचार पुढील प्रमाणे आहेत. “निरपेक्ष अहिंसा ही अत्यंत महान व्यक्तीची अहिंसा होय. धर्माचे पूर्णपणे पालन करणे म्हणजेच निरपेक्ष अहिंसा होय” गांधीजींच्या अहिंसेचे वैशिष्ट्ये खालील प्रमाणे नोंदविता येतील. गांधीजींच्या अहिंसेचे नकारात्मक रूप नसून ते संपूर्णतः सकारात्मक रूप आहे. गांधीजींच्या अहिंसेचा मार्ग हा हिंसेच्या मार्गापेक्षा श्रेष्ठ आहे. अहिंसेचा लढा नैतिक बळावर लढला जातो, त्यामुळे अहिंसेचा मार्ग स्वीकारणारा व्यक्ती नैतिकदृष्ट्या उन्नत बनतो. हिंसक मार्गाने कधीही समस्यांची उकल होत नाही. उलट त्यातून नवी संघर्षाची बीजे रोवली जातात. अहिंसक मार्गात पराभवाला स्थान नसते किंबहुना अहिंसात्मक  मार्गांमध्ये जय पराजयाचा प्रश्न नसतो.

अहिंसक मार्ग हा व्यक्तिगत तसेच सामूहिकरित्या आचरणात आणता येणारा  मार्ग आहे.अहिंसेचा लढा आत्मिक बळावर लढावयाचा असतो. या लढ्यात लढा देणारा सत्यनिष्ठ, न्यायप्रिय आणि नीतिमान असणे महत्त्वाचे असते. अन्याय व  जुलमा विरुद्ध लढण्याचे अत्यंत प्रभावी हत्यार म्हणजे अहिंसा हा मार्ग होय. अहिंसा म्हणजे दौर्बल्याचा आविष्कार, हा अर्थ गांधींना मंजूर नाही. अहिंसेत  प्रचंड शक्ती असते. असे गांधींना वाटते. सत्य, अहिंसा ही परमार्थापुरती ठीक आहेत परंतु त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारात फारसा उपयोग होत नाही. राजकारणात जशास तसे हाच न्याय लागू केल्याशिवाय गत्यंतर नाही अशी सर्वसामान्य लोकांची नव्हे तर मोठ मोठ्या पुढऱ्यांचीही समजूत होती. महात्मा गांधींनी मोठ-मोठी अहिंसात्मक आंदोलने यशस्वी करून लोकांचा हा गैरसमज दूर केला व अहिंसा सामूहिक प्रतीकाराचे एक प्रभावी शस्त्र आहे याची लोकांना प्रचिती आणून दिली. महात्मा गांधी यांच्यासाठी 'अहिंसा' केवळ आदर्श संकल्पना नव्हती तर एक जगण्याचा अविभाज्य भाग होती. त्यांच्यासाठी अहिंसा इतकी महत्त्वाची होती की त्यामुळे त्यांनी हिंसेकडे सापेक्ष दृष्टिकोनातून पाहिले नाही. अगदी अपाद्धर्म  म्हणून देखील त्यांना हिंसा मान्य नव्हती. पवित्र - अपवित्र हिंसा असा भेद त्यांना मान्य नव्हता. व्यक्तीतील मानवतेचा अंकुरच हिंसेमुळे संपतो म्हणून ते हिंसेला विरोध करतात. गांधींना प्रश्न सोडविण्यासाठी हिंसेची गरज नव्हती. त्यांची अहिंसा मजबूत होती. ती सत्यावर उभी होती. अहिंसेचे तत्वज्ञान ही महात्मा गांधींची सर्वात मोठी देणगी होय. त्यांनी म्हटले आहे “हिंसा ही पशूच्या जीवनाचा कायदा आहे तर अहिंसा हा मानवी जीवनाचा नियम आहे. पशु हा शारीरिक शक्तीच्या आधारावर जगत असतो तर मानव अधिक उच्च अशा अहिंसेच्या तत्वावर जगत असतो. अहिंसा ही एक पूर्ण अवस्था आहे आणि मानव निसर्गतः कळत नकळत या अवस्थेप्रत

जात आहे" गांधींनी 'अहिंसा' हे केवळ तत्त्वज्ञानातील तत्त्व म्हणून मानले नाही. ते म्हणत, "अहिंसा हा माझ्या जीवनाचा नियम आणि नि: श्वास आहे. अहिंसा ही माझ्या बुद्धीशी संबंधित नाही तर माझ्या हृदयाशी संबंधित आहे". १९३५ मध्ये महात्मा गांधींनी आपल्या आपल्या 'हरिजन' या नियतकालिकात अहिंसा म्हणजे जगातील कोणासही आपल्या शब्दांनी, विचारांनी आणि कृतींनी न दुखविणे अशी व्याख्या केली.आज गांधींच्या अहिंसेची जास्त निकड भासत आहे कारण जागतिक स्तरावर मूल्य व्यवस्था ढासळत आहे. हिंसाचार अनेक पटीने वाढलेला आहे. व्यक्ती हा माणुसकी या धर्मापासून कोसो दूर जात आहे. चंगळवादाने हिंसक रूप धारण केले आहे. समाजात त्यामुळे मानवी मूल्यांचा झपाट्याने ऱ्हास होत आहे.

गांधीजींच्या सर्व विचारांचा आधार सत्य तत्व होय. सत्याशिवाय कोणतेही तत्त्व पूर्ण होत नाही. असे गांधीजींचे स्पष्ट मत होते. सत्य हा अहिंचेचा मुख्य घटक आहे. अहिंसा सत्यावर आधारलेली असते. त्यामुळे अहिंसेची सत्यापासून फारकत करता येत नाही. गांधीजींची ईश्वरावर अपार श्रद्धा म्हणून त्यांनी सत्य आणि ईश्वर यांचा संबंध जोडला आहे. ते म्हणतात, "केवळ ईश्वर सत्य आहे म्हणून भागणार नाही, सत्य हाच ईश्वर आहे". गांधीजींनी सत्याचे दोन प्रकारात वर्गीकरण केले आहे. १) सापेक्ष सत्य २) निरपेक्ष सत्य.सापेक्ष सत्य यात व्यक्ती किंवा परिस्थितीनुसार सत्याची कल्पना बदलत असल्यास त्याला सापेक्ष सत्य म्हणतात. सापेक्ष सत्याला पूर्ण सत्य म्हणता येणार नाही. निरपेक्ष सत्य जीवनातील निरनिराळ्या अनुभवातून सापेक्ष सत्याच्या सहाय्याने व्यक्ती निरपेक्ष सत्याकडे जात असते. अशा प्रकारचे सत्य हे सत् - चित -आनंद यांचा शुभ समन्वय होय. या सत्याकडे पोहोचण्याकरिता व्यक्तीला फार मोठी किंमत द्यावी लागते. अशा प्रकारचे सत्य म्हणजे ईश्वर होय. निरपेक्ष सत्य हे सर्वश्रेष्ठ सत्य आहे. सापेक्ष सत्याच्या बाबतीत होणाऱ्या चुका लक्षात घेऊनच निरपेक्ष सत्याकडे जाणारा मार्ग मोकळा होतो. सत्य म्हणजे सर्वोच्च प्रेम, सर्वोच्च दया, सर्वोच्च आत्मबलिदान होय. सत्याची पूर्ती आणि अहिंसेने शक्य आहे. सॉक्रेटिस, येशू ख्रिस्त यांनी सत्यासाठी प्राणार्पण केले.

धैर्य, विवेक, आत्मविश्वास आणि त्याग या सर्व गोष्टी सत्याच्या प्राप्तीसाठी आवश्यक आहेत. सत्य म्हणजे अंतरात्म्याची शक्ती होय. गांधीजींनी अहिंसेपेक्षा सत्यावर जोर दिला. सत्यासाठी अहिंसेचा त्याग करायला ते तयार होते; पण अहिंसेसाठी सत्याचा नव्हे. सत्य म्हणजे माणसाच्या अंतकरणाला जे जाणवते व सद्सदविवेक बुद्धीला जे पटते तेच त्याचे सत्य. सत्य आणि अहिंसा एकरूपच आहे. सत्याचा शोध अहिंसेशिवाय अशक्य आहे. त्रिकालबादीत तत्त्व एकच आहे ते म्हणजे सत्य. अशी गांधीजींची श्रद्धा होती. सत्य व अहिंसेचे पुजारी असे गांधींना म्हटले जाते. त्यांच्या सत्य अहिंसेच्या आग्रहामुळेच त्यांना संतत्व प्राप्त झाले. गांधींनी स्वातंत्र्यलढ्यात अहिंसा व सत्य या मूल्यांचा आग्रह धरला. गांधीजी सत्य म्हणजे परमेश्वर असे मानत. सत्याचा शोध म्हणजे परमेश्वराची प्राप्ती. हा सत्याचा शोध माणसाने अखंडपणे चालू ठेवला पाहिजे. व्यक्तीची समाजाची प्रगती होण्यासाठी सत्य व अहिंसा या तत्त्वांची कास धरली पाहिजे. सत्याचे पालन सदैव केले पाहिजे. आपले विचार व कृती दोन्ही सत्याधारित असली पाहिजे.

गांधीजी सत्य व अहिंसा यांच्यात फरक करत नाहीत. सत्याच्या आधारेच जीवनात अहिंसा रुजविता येते. त्यासाठी भारतात नवीन नाही. बौद्ध, जैन, लिंगायत या सर्व धर्मांनी फार प्राचीन काळापासून हिंसा वर्ज्य मानली आहे.'अहिंसा परमोधर्म' हे तत्व भारतीयांना पूर्वीपासूनच मान्य व प्रिय आहे. गांधींनी अहिंसा व सत्य या तत्त्वांना राजकारणात व समाजकारणात रुजविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला.अहिंसेचा म्हणजे केवळ हिंसेचा अभाव असा अर्थ गांधींना मान्य नाही. मनाची हिंसा सुद्धा त्यांना मान्य नाही. आपले बोलणे, वागणे असे असावे की, इतरांच्या मनाला यातना होऊ नयेत, त्रास होऊ नये, इजा, दुखापत होऊ नये, व्देषाचीभावना बाळगू नये गांधीजी याला सुद्धा हिंसा म्हणतात. सत्य आणि अहिंसा यासंदर्भातील विचारांचा आढावा घेतला असता असे लक्षात आले की, महात्मा गांधी यांच्या विचारांची गरज आज या देशाला नव्हे तर जगाला आहे. या विचारांमुळे जगातील हिंसाचार, दहशतवाद, भ्रष्टाचार या अनिष्ट बाबी संपूर्णत: नष्ट होतील आणि सत्य, अहिंसा, प्रामाणिकपणा, नैतिकता या मूल्यांची जपणूक होईल.यामुळे संपूर्ण विश्वात बंधुभाव प्रस्थापित होईल.

**निष्कर्ष**

१. सत्य आणि अहिंसा ही वस्तुतः एकरूप असते असे गांधीजी मानत.
२. गांधीजींनी सर्वात तीव्र हिंसेला सर्वोच्च अहिंसेनेच नमविले.
३. देशाच्या स्वातंत्र्यासाठी, समाजमुक्तीच्या लढ्यासाठी, मानवाच्या कल्याणासाठी गांधीजींनी सत्य आणि अहिंसेचा लढा दिला.
४. गांधीजींची देशभक्ती ही मानवतेवर अधिष्ठित होती.
५. गांधीजी सत्याशी सर्व उच्चतम गोष्टीचा संबंध जोडीत असत.

**संदर्भ सूची**

१. डॉ. वा.भा. पाटील - आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत (भाग दोन) प्रकाशन प्रशांत पब्लिकेशन्स प्र.आ.२००९
२. डॉ.सूर्यकांता अजमेरा, सौ.अनुराधा पोतदार - महात्मा गांधीजींची विचारधारा प्रकाशन - अथर्व पब्लिकेशन्स प्र.आ. २०११
३. डॉ.वि. मा. बाचल, प्रा.स.म.गोळवलकर, प्रा.र.घ.वराडकर, श्री. व्ही. एस. क्षीरसागर - भारतीय राजकीय विचारवंत प्रकाशन - अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस प्र.आ.२००२
४. रॉय किणीकर (संपादक)अनिल किणीकर (सहाय्यक संपादक) - गांधी नावाचे महात्मा प्रकाशन - डायमंड पब्लिकेशन्स प्र.आ. जानेवारी २०१२
५. महात्मा गांधी - माझ्या स्वप्नांचा भारत प्रकाशन - परंधाम प्रकाशन पवणार (वर्धा) चौ.आ.२००१
६. नलिनी पंडित - गांधी प्रकाशन - ग्रंथाली प्रकाशन प्र.आ.२ ऑक्टोबर १९८३

७. अनुवाद सरोज देशपांडे - महात्मा गांधी: राजकीय चरित्र डायमंड पब्लिकेशन पुणे प्र.आ.२००७

८. अरविंद ताटके - महात्मा गांधी सरिता प्रकाशन पुणे २००२